# पनवेल महानगरपालिका

## दीनदयाळ अंत्योदय योजना- राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान

## "जाहीर आवाहन"

---

**पनवेल शहरातील नगर पथविक्रेता समिती गठीत करणेकरीता इतर मंडळ / संघ प्रतिनिधींची निवड करणेबाबत इच्छुकांचे अर्ज मागविणेबाबत.**

या जाहीर आवाहनाद्वारे पनवेल शहरातील नागरिकांना कळविण्यात येते की, केंद्र शासनाकडील पथविक्रेता (उपजीविका संरक्षण व पथ विक्री विनियमन) अधिनियम २०१४ चे मधील कलम ३६ च्या पोटकलम (१) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन, नगर विकास विभागाने राजपत्र असाधारण भाग ४-अ, दिनांक ३ ऑगस्ट २०१६ रोजी पथविक्रेत्यांबाबत करावयाच्या कार्यवाहीकरिताचे नियम व आदेश शासन राजपत्राद्वारे प्रसिद्ध करण्यात आले आहे. शासनाच्या सदर नियम व आदेशातील प्रकरण ४ मधील कलम ११ (भाग-२-ख) अन्वये पनवेल शहरातील नगर पथविक्रेता समितीवर नामनिर्देशनासाठी विविध मंडळ/संघ यांचेकडील इच्छुक व्यक्तींकडून अर्ज मागवून प्रतिनिधींची निवड करणेकरिता प्रसिद्ध करणेबाबत आदेशित केले आहे.

सदर आदेशान्वये (१) अशासकीय संघटना व समुदाय आधारित संघटना (२ सदस्य), (२) निवासी कल्याण संघ (२ सदस्य), (४) व्यापारी संघ (१ सदस्य), (५) पणन संघ (१ सदस्य) याप्रमाणे मंडळ/संघ यांचेकडील प्रतिनिधींची निवड करण्यात येईल. सदर मंडळ/संघ यांचेकडील इच्छुक व्यक्तींकडून अर्ज मागवून शासनाच्या सदर नियम व आदेशातील प्रकरण ४ मधील कलम १२ अन्वये खालील नमूद केलेल्या किमान अर्हता निकषाच्या आधारावर सदर संघाच्या प्रतिनिधित्व करणाऱ्या सदस्याचे नामनिर्देशन करण्यात येईल.

१. संघटनेची किंवा संघाची क्षेत्रातील सक्षम प्राधिकरणाकडे नोंदणी केलेली असावी.
२. संघटना किंवा संघ मागील तीन वर्षांचे सक्षम प्राधिकरणाकडून तयार करण्यात आलेले लेखापरीक्षा अहवाल सादर करील.
३. संघटनेस किंवा संघास स्थानिक प्राधिकरणाने काळ्या यादीत टाकलेले नसावे.
४. संघटना किंवा संघ त्या त्या वेळी अमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये सिद्धदोषी असणार नाहीत.
५. संघटना किंवा संघ यांना त्यांनी सक्षम प्राधिकरणाकडे नोंदणी केल्याच्या त्यांच्या प्रवर्गामधील कामाचा किमान ५ वर्षांचा अनुभव असावा.

या जाहीर आवाहन प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसांचे आत (दि.७/७/2023 अखेरपर्यंत) कार्यालयीन वेळी व दिवशी मंडळ/संघ यांचेकडील इच्छुक व्यक्तींनी नामनिर्देशन अर्ज आवक-जावक विभागास सादर करावेत. तद्नंतर पनवेल शहरातील मंडळ / संघ यांचेकडील इच्छुक व्यक्तींकडून अर्ज केलेल्या अंतिम उमेदवारांची यादी तयार करण्यात येईल. सदर अंतिम यादी झाल्यानंतर महानगरपालिकेकडून शासनाच्या आदेशानुसार नगर पथविक्रेता समिती घटीत करण्याची प्रक्रिया राबविण्यात येईल. हे "जाहीर आवाहन" शहरातील मंडळ/संघ यांचेकडील इच्छुक व्यक्तींकडून अर्ज मागवून प्रतिनिधींची निवड घेणेकरिता देण्यात येत आहे.

टिप : नामनिर्देशन पत्र हे महानगरपालिकेच्या डे-एन.यु.एल.एम. विभागाकडून प्राप्त करुन घेणेचे आहेत.

**सही/-**
उपायुक्त (DAY-NULM),
पनवेल महानगरपालिका

जा.क्र.पमपा/DAY-NULM/SUSV/२४२३/प्र.क्र. ०१ / ४७ /२०२३
दिनांक :२२/०६/२०२३

Scanned by CamScanner

# पनवेल महानगरपालिका

**ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६**

**कार्यालय पत्ता** :- देवाळे तलावाच्या समोर, गोखले हॉलच्या शेजारी, पनवेल

**कार्यालय क्र.** : २७४५८०४०/४१/४२ **Email** : panvelcorporation@gmail.com


जा.क्र.पमपा/DAY-NULM/SUSV/२४२३/प्र.क्र.०५/ ४८ /२०२३ दिनांक : २२/०६/२०२३

**प्रति,**

१. श्री. जितेंद्र मढवी, प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती अ (खारघर)
२. श्री. अरविंद पाटील, अतिरिक्त प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती ब (कळंबोली)
३. श्री. अरविंद पाटील, प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क (कामोठे)
४. श्री. रोशन माळी, प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती ड (पनवेल)
पनवेल महानगरपालिका.

**विषय :** जाहिर आवाहन प्रसिध्द करणेबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयानुसार कळविण्यात येते कि, डे-एन.यु.एल.एम विभागामार्फत तयार करण्यात आलेले जाहिर आवाहन (**विषय : पनवेल शहरातील नगर पथविक्रेता समिती गठीत करणेकरीता इतर मंडळ / संघ प्रतिनिधींची निवड करणेकामी इच्छुकांचे अर्ज मागविणेबाबत**) जा.क्र. पमपा/ DAY-NULM/SUSV/ २४२३/प्र.क्र.०३ / ४७ /२०२३ हे आपल्या प्रभाग कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यात यावे.

सोबत : जाहिर आवाहन

२२/६/२०२३

**विभाग प्रमुख,**
**डे-एन.यु.एल.एम.विभाग**
**पनवेल महानगरपालिका.**

Scanned by CamScanner